Publication: Saamana
Date: 4/5/2019
Page: 5
Column: 2-3

सामना
शनिवार, ४ मे २०१९

# गोराईचा झामझडपाडा ७० वर्षांनंतर उजळला

## अदानी इलेक्ट्रिसिटीने दीड किलोमीटरची भूमिगत केबल टाकली | रहिवाशांमध्ये आनंदाचे वातावरण



मुंबई, दि. ३: (प्रतिनिधी) – मुंबापुरीपासून हाकेच्या अंतरावर असलेला गोराई येथील झामझडपाडा स्वतंत्र्यानंतर तब्बल ७० वर्षांनंतर आज लख्ख प्रकाशाने उजळला आहे. वर्षानुवर्षे अंधाराचा सामना करणाऱ्या येथील रहिवाशांच्या जीवनात प्रकाश टाकण्यासाठी उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या अदानी इलेक्ट्रिसिटीने सुमारे दोन कोटी रुपये खर्चून दीड किलोमीटरची भूमिगत केबल टाकली आहे. त्यानुसार येथे आजपासून वीजपुरवठा सुरू झाल्याने रहिवासी आनंद व्यक्त करत आहेत, तर काहींनी वीज मीटर केबिनची पूजा केली.

गोराईपासून दीड–दोन किलोमीटर असलेल्या या झामझडपाड्यात ५२ कुटुंबे आहेत. त्यांना वीजपुरवठा करण्यासाठी भूमिगत केबल टाकणे, वीज उपकेंद्र उभारणे आवश्यक होते. मात्र सदर जमीन जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात असल्याने अनेक वर्षांपासून हे काम लटकले होते, मात्र सहा महिन्यांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी भूमिगत केबल टाकण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार अदानीने रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीनजीक असलेल्या वीज उपकेंद्रापासून दीड किलोमीटरच्या केबल टाकून आज झामझडपाड्यात वीज आणली आहे. येथे असलेल्या ५२ पैकी ४८ पक्क्या घरांना वीज कनेक्शन दिले आहे, तर उर्वरित चार घरांना सुरक्षेच्या कारणास्तव अद्याप कनेक्शन दिले नसल्याचे अदानी इलेक्ट्रिसिटीने स्पष्ट केले आहे.

> लखलखती मुंबई पाहिल्यानंतर आम्हाला हेवा वाटायचा. आमचा पाडा कधी उजळणार असे वाटायचे. त्यासाठी गेल्या दीड वर्षापासून केलेल्या प्रयत्नाला अखेर यश आले असून वर्षानुवर्षे अंधारात असलेला आमचा पाडा उजळल्याने आता अन्य नागरी सुविधाही मिळतील.
> ▮ सुषमा दावडे, रहिवासी

### ढोलताशांच्या तालावर नाचत स्वागत

सात दशकांच्या प्रतीक्षेनंतर आज झामझडपाड्यातील रहिवाशांनी ढोलताशांच्या तालावर नाचत आपला आनंद साजरा केला, तर काहींनी वीज कर्मचाऱ्यांना पेढे वाटप केले. वर्षानुवर्षे आम्ही रॉकेलवर चालणाऱ्या दिव्याच्या प्रकाशात जगत होतो, पण आता मुंबईकरांप्रमाणेच आम्हालाही लख्ख प्रकाश मिळाला असल्याची प्रतिक्रिया चंद गोपाल परेड या रहिवाशाने व्यक्त केली.